# राज्य माहिती आयोग, मुख्यालय, मुंबई

माहितीचा अधिकार

**माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम १८ (१) अन्वये**
**दाखल केलेली तक्रार**

**क्र.मुमाआ/नों.क्र.१२५१ ते १२५४ /२३ /त.क्र.४८ ते ५१ /२६/०१**

श्री.त्रिभुवन दाठिया

विरुद्ध

जन माहिती अधिकारी मुंबई अग्नीशमन दल (परि-०५)
प्रमुख अग्नीशमन अधिकारी यांचे कार्यालय, वडाळा अग्नीशमन केंद्र,
शेख मिस्त्री दर्गा रोड, सी.जी.एस.कॉलनी, म्हाडा कॉलनी समोर,
अँटॉप हिल, वडाळा, मुंबई-४०० ०३७.

प्रथम अपिलीय अधिकारी तथा मुंबई अग्नीशमन दल (परि-०५)
प्रमुख अग्नीशमन अधिकारी यांचे कार्यालय, वडाळा अग्नीशमन केंद्र,
शेख मिस्त्री दर्गा रोड, सी.जी.एस.कॉलनी, म्हाडा कॉलनी समोर,
अँटॉप हिल, वडाळा, मुंबई-४०० ०३७.

**तक्रार अर्ज सुनावणी दिनांक : २४.०२.२०२६**

| | | |
|---|---|---|
| तक्रारदार | : | उपस्थित |
| विद्यमान जन माहिती अधिकारी | : | उपस्थित |
| प्रथम अपिलीय अधिकारी | : | उपस्थित |

प्रस्तुत सर्व प्रकरणी तक्रारदार श्री.दाठीया यांना विशेष मोहिमे अंतर्गत माहिती उपलब्ध करून देण्यात आली असून त्याबाबत ते समाधानी असल्याबाबत त्यांच्या स्वाक्षरीची लेखी पोच प्राप्त झाली असल्याचे नमूद करीत त्यांचे द्वितीय अपील अर्ज निकाली काढण्यात आले असल्याचा तीव्र आक्षेप नोंदविला आहे.

यात विशेष मोहिमेअंतर्गत त्यांना कुठलीच माहिती मिळाली नसल्याचे तसेच त्यांच्या द्वितीय अपील अर्जावर नियमानुसार सुनावणी घेणे आवश्यक असून सुनावणी न होताच आदेश देण्यात आला असल्याचा आक्षेप नोंदविलेला आहे.

आज झालेल्या सुनावणीत तक्रारदार हजर नसून त्यांनी सादर केलेल्या तक्रार अर्जाचे अवलोकन केले असता व विद्यमान व तत्कालीन जन माहिती अधिकारी व विद्यमान प्रथम अपिलिय अधिकारी हजर असून त्यांनी याप्रकरणी **जोडपत्र अ** संदर्भात मागितलेली माहिती विशेषतः एम/पूर्व, एम/पश्चिम येथील खाजगी शिकवणी वर्ग, औद्योगिक भूखंड, खाजगी नर्सिंग होम तसेच खाजगी व सार्वजनिक शाळा या संदर्भातील असून तत्कालीन जन माहिती अधिकाऱ्यांनी मागितलेल्या माहितीची व्याप्ती ही अतिशय व्यापक असून मागितलेली माहिती ही विस्तृत व मोघम स्वरूपाची असल्याने व सन २०१७ नंतरं मनपा येथील अग्निशमन विभागातर्फे

देण्यात येणारी परवानगी व ना-हरकत प्रमाणपत्रे ऑनलाइन पद्धतीने देण्यात येत असल्याने अपिलार्थिनी जर भूखंड क्रमांक अथवा सिटीएस नंबर कळविल्यास त्यानुसार त्यांना माहिती प्रदान करण्याचे प्रयत्न करण्यात येतील असे सुचित केले. त्याविरुद्ध अपिलार्थिनी दाखल केलेला प्रथम अपील अर्ज यात देखील अपिलिय अधिकाऱ्यांनी दिलेला प्रतिसाद योग्य असल्याचे नमूद करीत अपिल अर्ज निकाली काढला. दरम्यान आयोगाच्या वतीने बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या सहकार्याने विशेष मोहीम हाती घेण्यात आली व त्यात प्रथम अपिलीय अधिकाऱ्यांना अर्ज निकाली काढण्याचे अधिकार देण्यात येऊन उपलब्ध असलेली व **कलम २ (च)** प्रमाणे देय असलेली **दीडशे पृष्ठांपर्यंतची** माहिती प्रदान करण्याचे निर्देश देण्यात आले होते.

ही बाब लक्षात घेता विशेष सुनावणी मोहीम अंतर्गत अपिलार्थींनी याबाबतीतील स्पष्टता दिल्यास माहिती उपलब्ध करून देण्याबाबत सुनावणी दरम्यान सुचित करण्यात आले, मात्र तसे न करता तक्रारदार यांनी प्रस्तुत तक्रार अर्ज दाखल केला असून यात घेतलेला आक्षेप हा प्रथमदर्शनी **कलम १८ (३)** तरतुदींशी सुसंगत नसल्याचे आढळून येते. कारण अपिलार्थिना जन माहिती अधिकारी स्तरावर त्यांच्या चारही अर्जात नमूद विषयांकित माहिती बाबत प्रतिसाद देण्यात आला होता. तसेच अपिलिय अधिकाऱ्यांनीही रितसर सुनावणी घेतली असल्याचे आढळून येते.

अपीलार्थिनी त्यांच्या तक्रार अर्जावर नमूद केलेला विषय हा कलम १८ तरतूदिशी सुसंगत नसल्याची वस्तुस्थिती लक्षात घेता प्रस्तुत चारही तक्रार अर्ज निकाली काढून नस्तीबद्ध करण्यात येत आहेत.

**आदेश**

**वरील तक्रार अर्ज निकाली काढण्यात येत आहेत.**

State Information Commission Maharashtra

**( राहुल भा. पांडे )**
**राज्य मुख्य माहिती आयुक्त**

**ठिकाण : मुंबई**
**दिनांक : २४.०२.२०२६**